**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION**

**Solid Waste Management, P/South**

सहाय्यक अभियंता(घकव्य)पी/दक्षिण यांचे कार्यालय, पी/दक्षिण विभाग कार्यालय, सी.टी.एस.क्र. ७४६, व्हिलेज पहाडी स्वामी विवेकानंद मार्ग, गोरेगाव(पश्चिम) मुंबई-104

# <u>सूचना</u>

विषय: विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 च्या अनुषंगाने 50 मीटर परिध क्षेत्राची स्वच्छता राखणे तसेच शौचालयाची स्वच्छता ठेवणे यासाठी अशासकीय संस्थाची नेमणूक करणेबाबत.

**पी/दक्षिण विभागाच्या प्रशासकीय हद्दीतील संस्थांना** याद्वारे सुचित करण्यात येते की **दि.18 नोव्हेंबर, 2024 ते दि. 21 नोव्हेंबर, 2024** या 04 दिवसाकरीता विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 च्या अनुषंगाने 50 मीटर परिध क्षेत्राची स्वच्छता राखणे तसेच शौचालयाची स्वच्छता ठेवणे यासाठी अशासकीय संस्थाची नेमणूक करण्यात अंतर्गत साफसफाईच्या कामाकरीता वरील विषयांस नमूद करण्यात आलेल्या योजनांतर्गत कामगार / स्वयंसेवक पुरविण्याकरीता मोहरबंद इच्छापत्र मागवित आहोत.

अर्ज तसेच योजनेच्या अटी व शर्ती सहाय्यक अभियंता (घकव्य) पी/दक्षिण विभाग ह्यांच्या कार्यालयात निशुल्क उपलब्ध असून त्या दि. 15 नोव्हेंबर, 2024 ते दि. 16 नोव्हेंबर, 2024 पर्यंत सकाळी 11:00 ते दुपारी 02:00 वाजेपर्यंत घेऊ शकता. अर्ज भरताना सोबत छाननी शुल्क रु. 330/- अधिक 18% जीएसटी इतके रोखीने नागरीक सुविधा केंद्रामध्ये भरलेल्याची पावती जोडणे अनिवार्य आहे. इच्छूक अशासकीय संस्थांनी आपले अर्ज सहाय्यक अभियंता (घकव्य) पी/दक्षिण यांच्या कार्यालयात दि. 16 नोव्हेंबर, 2024 दुपारी 04:00 वाजेपर्यंत सादर करावेत. नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधीनंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाही.

योजनेच्या अटी व शर्ती नुसार पात्र ठरलेल्या संस्थांपैकी **05** संस्थांची दि. 16 नोव्हेंबर, 2024 रोजी दुपारी 05:00 वाजता **सोडत पद्धतीने** सदर कामाकरीता निवड करुन कामाची संधी देण्यात येईल. सदर सोडतीस पात्र संस्थांच्या अध्यक्षांस / सचिवास / खजिनदार पैकी कोणत्याही एकास त्यांच्या ओळखपत्रासहीत उपस्थित रहाणे **बंधनकारक** असेल. सोडतीबाबत सर्व अधिकार महानगरपालिका राखून ठेवत आहे.

सही/-दिनांक १४/११/२०२४

**सहाय्यक आयुक्त (पी/दक्षिण)**